# लाईनमन ॲप्लिकेशन

# पुस्तिका

प्रधानमंत्री किसान ऊर्जा सुरक्षा एवं उत्थान महाभियान (कुसुम योजना)

# विषयसूची

लाईनमन ॲप्लिकेशन ........ 3
नोंदणी स्क्रीन: ........ 5
नोंदणी करा: ........ 6
डॅशबोर्ड: ........ 7
सर्वेक्षणाची तारीख व वेळ निश्चिती: ........ 9
प्रत्यक्ष सर्वेक्षण : ........ 13
सर्वेक्षणाचे फोटो: ........ 15
सर्वेक्षणाबाबत स्वाक्षरी: ........ 16
डेटा अपलोड करा: ........ 17
प्रलंबित डेटा: ........ 18
पूर्ण डेटा: ........ 19
बँक तपशील: ........ 20
डेटा डाउनलोड करा: ........ 21
काही महत्वाचे: ........ 22

# लाईनमन ॲप्लिकेशन

लाईनमनला त्याच्या मोबाईल नंबर वर एक मेसेज पाठवला जाईल, त्यामध्ये अँड्रॉइड ॲप्लिकेशन डाउनलोड करण्यासाठी लिंक असेल. त्या लिंक वरून लाईनमन ते ॲप्लिकेशन मोबाईल मध्ये डाउनलोड करू शकेल.

***टीपः*** *ॲप मधून घेतलेल्या सर्व इमेजेसवर त्या त्या ठिकाणचा अक्षांश आणि रेखांश (latitude & longitude) येईल आणि ते लाभार्थी तपशील मधील अक्षांश आणि रेखांश (latitude & longitude) माहितीनुसार पडताळणी करूंन घेता येईल.*

## ❖ एकवेळ नोंदणी :

एकदा लाइनमने ॲप्लिकेशन डाउनलोड केल्यावर लाइनमॅनला त्याचा / तिचा मोबाईल क्रमांक ॲप्लिकेशनमध्ये भरणे आवश्यक आहे.

1) जर त्या लाइनमॅनचा नंबर व नाव महाऊर्जाच्या डेटाबेसमध्ये नोंदविलेला असेल तर त्याला/तिला त्या नोंदणीकृत मोबाइल नंबरवर ओटीपी मिळेल. (लाइनमॅनच्या मोबाईल क्रमांकाची माहिती महावितरण कडून प्राप्त करून घेतलेली आहे).
2) आणि जर त्या लाइनमॅनचा नंबर व नाव डेटाबेसमध्ये नसेल तर "**नोंदणी करा**" या बटनावर क्लिक करून तो/ती आपली माहिती भरून लॉगिन करू शकेल.



## ❖ ओटीपी पडताळणी :

आपण भरलेला मोबाईल नंबर डेटाबेसमध्ये नोंदविलेला असल्यास खालीलप्रमाणे ओटीपी स्क्रीन दिसेल. नोंदणीकृत मोबाइल नंबरवर प्राप्त झालेला ओटीपी या ठिकाणी भरणे आवश्यक आहे.



## ❖ नोंदणी स्क्रीन:

एकदा ओटीपी भरल्यावर खालीलप्रमाणे स्क्रीन दिसेल ज्यामध्ये प्राथकमि तपशील भरावयाचा आहे.







वापरकर्त्याने सर्व आवश्यक रकाने भरल्यानंतर, लाइनमन म्हणून महावितरणकडून तो/ती ज्या गावांचे कामकाज पाहत आहे ती सर्व गावे निवडावीत.

*(भूजल सर्वेक्षण विभागाने जाहीर केलेल्या सुरक्षित गावांची यादी या डेटाबेसमध्ये सामाविष्ट आहे व सध्या केवळ याच गावांमध्ये कुसुम योजनेचे काम करण्यात येणार आहे. आपल्या कार्यक्षेत्रातील गाव/गावे यामध्ये सामाविष्ट नसल्यास भूजल सर्वेक्षण विभागाकडून ज्यावेळेस सुधारित यादी प्राप्त होईल त्यावेळेस आपल्याला त्याबाबत कळविण्यात येईल. )*

**"तपशील दाखल करा"** बटणावर क्लिक केल्यास लाइनमन डॅशबोर्ड पाहू शकेल.

## ❖ नोंदणी करा:


डेटाबेसमध्ये लाइनमन उपस्थित नसल्यास तो "नोंदणी करा" बटणावर क्लिक करू शकतो आणि लॉग इन करण्यासाठी आवश्यक तपशील भरू शकतो.







## ❖ डॅशबोर्ड:

एकदा नोंदणी केल्यावर लाइनमन हा योजनेचा तपशील, भाषा बदलण्याचे चिन्ह आणि कुसुम योजनेशी संबंधित डॅशबोर्ड पाहू शकेल.






योजना निवडल्यानंतर लाइनमॅन योजनेची तपशीलवार स्क्रीन पाहू शकेल.




## ❖ काम वाटप:

वाटप केलेल्या कामात, आपल्या कार्यक्षेत्रामध्ये मंजूर करण्यात आलेल्या सर्व लाभार्थी यांची सर्वेक्षण बाबत माहिती दिसेल.

## ❖ पूर्ण काम:

पूर्ण झालेल्या कामात, सर्व लाभार्थ्यांची त्यांची काम पूर्ण झालेल्या कामांची यादी सर्वेक्षण संबंबित लाइनमनला पाहता येईल.

## ❖ प्रलंबित कार्य:

प्रलंबित कामांमध्ये, लाइनमनला त्याच्याकडे संयुक्त सवेक्षण साठी प्रलंबित कामांची / लाभार्थ्यांची यादी पाहता येईल. जे. एस. आर. (संयुक्त सवेक्षण) साठी वाटप केलेल्या कामांवर क्लिक केल्यानंतर संबंबित लाभार्थ्यांची यादी दाखविली जाईल. जो पर्यंत पुरवठादार कंपनी साईट अभियंता नियुक्त करत नाही तो पर्यंत लाइनमनला प्रारंभ आणि कॅलेंडर बटण पाहता येणार नाही आणि त्याला "कामाचे वाटप थांबवून ठेवले आहे" अशी स्थिती दिसेल.


## ❖ सर्वेक्षणाची तारीख व वेळ निश्चिती:

पुरवठादार कंपनीने साईट अभियंता नियुक्त केल्यानंतर, लाइनमन कॅलेंडर बटणाद्वारे जॉईंट सर्वे करण्यासाठी तारीख आणि वेळ, संबंबित साइट अभियंत्यास कॉल करून, निश्चित करेल.

लाइनमन व साईट अभियंता यांनी आपापसात चर्चा करून तारीख आणि वेळ ठरविल्यानंतर नंतर लाइनमन याने कॅलेंडर बटनावर क्लिक करून त्यामध्ये दिनांक नोंदवावा. अशा प्रकारे शेड्युल निश्चित झाल्यावर लाभार्थीच्या नावासमोर ती तारीख आणि वेळ दिसून येईल.


***टीप***: *पुरवठादार कंपनीने वेबसाईटवरून साईट इंजिनेरची निवड केल्यापासून १५ दिवसांच्या आत लाइनमॅनला तारीख निवडावी लागेल.*

कॅलेंडर बटनावर क्लिक करून लाइनमन संबंबित लाभार्थीसाठी सर्वेक्षण वेळापत्रक तयार करेल. त्यानंतर साइट अभियंता व लाभार्थ्यांना ‘ एसएमएस ‘ जाईल तसेच यासंदर्भात पुश सूचना मिळेल.


लाभार्थी सर्वेक्षण
संयुक्त सर्वेक्षण
कॅलेंडर बटण
A. Rahuf Ismail Baloch
Sai Housing Society
सर्वेक्षण सुरु करा
फिल्टर
तारीख निवडा
2021
रवि, एप्रिल 12
एप्रिल 2021
रद्द करा
ठीक आहे

## ❖ फिल्टर :


लाइनमन फिल्टर चिन्हावर क्लिक करून लाभार्थी यादीस फिल्टर करू शकतात. विशिष्ट गाव निवडल्यास केवळ त्याच गावातील लाभार्थी यांची यादी दिसेल.



## ❖ नकाशाचा वापर : (Google Map)

नकाशा वापरताना लाइनमन लाभार्थ्यांची स्थाने तपासू शकतील. तसेच, तो त्याच स्थानावरून इच्छित स्थानावर नेव्हिगेट करू शकतो. प्रत्यक्ष सर्वेक्षण करण्यासाठी करावयाच्या प्रवासाचे नियोजन करण्यासाठी याचा उपयोग करता येईल.




संबंबित लाभार्थ्याच्या “सवेक्षण सुरू करा ” बटणावर क्लिक केल्यास लाइनमन नोंदणीच्या वेळी लाभार्थ्यांनी भरलेला तपशील दिसेल. तसेच सर्वे करताना भरवायचे रकाने त्यांना दिसतील.


## प्रत्यक्ष सर्वेक्षण :








10:20 AM
सर्वेक्षण अहवाल
जलस्तोत आणि सिंचन माहिती
जलस्त्रोत प्रकार
Farm Pond
जलस्त्रोत खोली (फुटामध्ये)
20
सिंचन प्रकार
Sprinkler
सध्या असलेल्या पंपाची माहिती
सध्या तुम्ही पंप वापरत आहात का ?
Yes
सध्याचा पंप प्रकार
DC
सध्याचा पंप उप प्रकार
Surface
एचपी मध्ये सध्याची पंप क्षमता
3
सध्याच्या पंपचा उर्जा स्रोत
Diesel
ऊर्जा कार्यक्षम पंप
Yes
वर्षाला लागणारे डिझेल (लिटरमध्ये)
500
आवश्यक पंपाची माहिती
आवश्यक पंप प्रकार
DC
आवश्यक पंप उप प्रकार
Surface
पंप क्षमता
7.5HP-DC
उन्हाळी हंगामातील पाण्याची
50
सर्व्हे दाखल करा


10:20 AM
सर्वेक्षण अहवाल
आवश्यक पंपाची माहिती
आवश्यक पंप प्रकार
DC
आवश्यक पंप उप प्रकार
Surface
पंप क्षमता
7.5HP-DC
उन्हाळी हंगामातील पाण्याची पातळी / पाण्याची खोली (फुटामध्ये)
50
तपासले?
शेरा द्या
पावसाळी पाण्याची पातळी / पाण्याची खोली (फुटामध्ये)
50
तपासले?
शेरा द्या
दररोज लागणारे पाणी (लिटरमध्ये)
water
यूएसपीसी आवश्यक आहे?
No
Land is under Shadow
Yes No
आवश्यक कागदपत्रे अपलोड करा किंवा जोडा
७/१२ उतारा (विहीर / कुपनलिका शेतात असल्यास ७/१२ उताऱ्यावर नोंद आवश्यक ) एकापेक्षा जास्त नावे असल्यास इतर भोगवटादाराचे ना-हरकत प्रमाणपत्र रु.२००/- च्या मुद्रांक कागदवर सादर
सर्व्हे दाखल करा


10:20 AM
सर्वेक्षण अहवाल
आवश्यक कागदपत्रे अपलोड करा किंवा जोडा
७/१२ उतारा (विहीर / कुपनलिका शेतात असल्यास ७/१२ उताऱ्यावर नोंद आवश्यक ) एकापेक्षा जास्त नावे असल्यास इतर भोगवटादाराचे ना-हरकत प्रमाणपत्र रु.२००/- च्या मुद्रांक कागदवर सादर करावे.
आधारकार्ड प्रत
रद्द केलेली धनादेश प्रत / बँक पासबुक प्रत
पासपोर्ट आकाराचा छायाचित्र
शेत जमिन/विहीर/पाण्याचा पंप सामाईक असल्यास इतर
सर्व्हे दाखल करा


10:20 AM
सर्वेक्षण अहवाल
शेत जमिन/विहीर/पाण्याचा पंप सामाईक असल्यास इतर भागीदाराचे ना हरकत प्रतिज्ञापत्र
अनुसूचित जाती / जमातीचे जातीचे प्रमाणपत्र
नेटवर्क उपलब्ध आहे का?
होय
नाही
लाभार्थींनी अपलोड केलेल्या माहितीनुसार सिंचन स्त्रोत अस्तित्वात आहे का?.
होय
नाही
शेरा द्या
ए.जी. कनेक्शन (पॉवर) लाभार्थीच्या नावे सिंचन स्रोतावर उपस्थित आहे की नाही.
होय
नाही
शेरा द्या
साइट फोटो अपलोड करा
सर्व्हे दाखल करा

**नोट:** जेव्हा "उपलब्ध नेटवर्क" बटणावर क्लिक कराल, तेव्हा ते तेथील जागेचे उपलब्ध नेटवर्क आपोआप दाखवून देईल.

### ❖ सर्वेक्षणाचे फोटो:

प्रत्येक सर्वेक्षणामध्ये त्या ठिकाणचे ३ फोटो काढणे आवश्यक आहे. यामध्ये एक फोटो संबंधित लाभार्थी यांचेसोबत लाइनमन यांचा असणे आवश्यक आहे.

### ❖ सर्वेक्षणाबाबत स्वाक्षरी:

सर्वेक्षण पूर्ण झाल्यानंतर त्याठिकाणी उपस्थित लाभार्थी अथवा त्याचा प्रतिनिधी यांनी तसेच पुरवठादार यांचे साईट अभियंता व लाइनमन यांनी मोबाईलच्या स्क्रीनवर, संबंधित रकण्यामध्ये बोटाने स्वाक्षरी करणे आहे.







एकदा "सर्व्हे दाखल करा" बटणावर क्लिक केल्यास आपल्या अभिप्रायासह संपूर्ण माहिती महाऊर्जाकडे पाठविली जाईल.

## ❖ डेटा अपलोड करा:

एकदा डेटा सबमिट झाल्यावर तो मेनू ड्रॉवरमधील "अपलोड डेटा" फील्डमध्ये दर्शवेल. जर अपलोड डेटा फिल्ड समोर काही नंबर असतील तर याचा अर्थ डेटा रेंर्ज नसल्यामुळे (नेटवर्क नसल्यामुळे ) डेटा अपलोड झाला नसून अद्याप मोबाईलमध्ये आहे आणि अद्याप क्लाउडवर पाठविला नाही.




अपलोड फॉर्म दोन स्वरूपात दर्शवेल:

1. प्रलंबित डेटा
2. पूर्ण डेटा

## ❖ प्रलंबित डेटा:

आपण नेटवर्क क्षेत्रामध्ये असल्यास, रेकॉर्ड थेट अपलोड होईल परंतु संबंधित क्षेत्रात कोणतेही नेटवर्क नसल्यास मेनू ड्रॉवरच्या "अपलोड डेटा" अंतर्गत "प्रलंबित डेटा" मध्ये दर्शविला जाईल.

एकदा लाइनमन नेटवर्क क्षेत्रात आल्यानंतर तो "अपलोड डेटा"बटणावर क्लिक करून "प्रलंबित डेटा"फील्डमध्ये असलेला सर्व डेटा अपलोड करू शकतो.

चित्र खाली दर्शविले आहे:



### ❖ पूर्ण डेटा:

या फील्डमध्ये, यशस्वीरित्या अपलोड केलेल्या डेटा फायली दर्शविल्या जातील.



## ❖ बँक तपशील:

प्रथम जेएसआर झाल्यावर लाइनमॅनला बँकेचे तपशील भरण्यासाठी सूचना मिळेल. यासाठी मेनू ड्रॉवर मध्ये एक पर्याय आहे. जोपर्यंत तो बँकेचा तपशील भरत नाही तोपर्यंत तो लाल राहील आणि लाइनमन अॅपमध्ये त्याची सूचना दिसत राहील.

लाइनमनने बँक खात्याचा तपशील भरल्यानंतर महाऊर्जा मार्फत सर्वेक्षण मानधन या अकाउंटमध्ये पाठविले जातील.






## ❖ डेटा डाउनलोड करा:

लाइनमॅनला आलेल्या मेसेजच्या माध्यमातून असाईनमेंट कामाची माहिती मिळाली.

जेव्हा लाइनमनला माहित असेल की तो नेटवर्क नसलेल्या भागात जात आहे तेव्हा लाईनमन असाइन केलेला लाभार्थी डेटा आधी डाउनलोड करू शकतो. एकदा तो नेटवर्क क्षेत्राकडे परत आल्यावर तो "अपलोड डेटा"फील्ड निवडून अपलोड करू शकतो.

जर लाइनमॅन आधीपासूनच ॲप्लिकेशनमध्ये लॉग-इन असेल तर नवीन नियुक्त लाभार्थी लाइनमनला दर्शविले जाणार नाही जोपर्यंत तो "डाउनलोड डेटा" वर जाऊन क्लिक करत नाही.

एकदा डाउनलोड डेटावर क्लिक केल्यावर असाइन केलेल्या लाभार्थ्यांची यादी रीफ्रेश होईल आणि लाइनमॅनला दर्शविली जाईल.

## ❖ काही महत्वाचे:

एकूण मंजूर कामांपैकी काही ठिकाणी मोबाईल नेटवर्क नसण्याची शक्यता आहे. सदरहू सर्वेक्षण संपूर्ण पणे ऑनलाइन होणार असल्याने अशा ठिकाणी गेल्यानंतर अडचण उद्भवू नये यासाठी सर्वेक्षणाला जाण्यापूर्वी “मेनू ड्रावर” मधील “डेटा डाउनलोड करा” या बटनावर क्लिक करून, आपणास त्या क्षणापर्यंत वाटप केलेल्या सर्व कामांचा डेटा आपल्या मोबाईल मध्ये साठवून ठेवा. या साठवलेल्या डेटाच्या आधारे आपणास सर्वेक्षणाची सर्व कार्यवाही ऑनलाईन पूर्ण करता येईल.

एकदा फॉर्म मंजूर झाला आणि सबमिट झाल्यावर मेनू ड्रॉवरमधून डेटा “अपलोड डेटा” फिल्डमध्ये दाखविला जाईल. अपलोड डेटामध्ये, डेटाचे 2 प्रकार आहेत म्हणजे प्रलंबबत डेटा आणि पूर्ण डेटा. फॉर्म सबमिट केल्यानंतर, लाइनमन नेटवर्क क्षेत्रात असेल तर सबमिट केलेला डेटा अपलोड डेटा फिल्डच्या पूर्ण डेटा टॅबमध्ये दर्शविला जाईल. परंतु जर लाइनमन नेटवकड क्षेत्रामध्ये नसेल तर सबबमट केलेला फॉर्म अपलोड डेटा मेनू ड्रॉवरच्या प्रलंबित डेटामध्ये दर्शविला जाईल. लाइनमन चांगल्या नेटवर्क क्षेत्रात आल्यानंतर तो मेनू ड्रॉवरमध्ये प्रलंबबत असलेला डेटा अपलोड करू शकतो.

स्क्रीनवरच्या फिल्टरमधून जिल्हा, तालुका व गाव निवडून आणि त्याच्या जागेपासून शक्यतो जवळचे अंतर जाणून घेऊन लाइनमन आपल्या सोयीनुसार लाभार्थीची निवड करू शकेल.